महाराष्ट्र टाइम्स

# आर्थिक लाभ नसल्याने उदासीनता

Maharashtra Times| Sep 23, 2018, 04.00 AM IST

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील ४३७४ कॉलेजांपैकी १२५३ कॉलेजांकडेच 'राष्ट्रीय मूल्यांकन आणि मूल्यमापन परिषदेचा'(नॅक) दर्जा असल्याचे समोर आले आहे. 'नॅक' मूल्यांकन घेतलेल्या कॉलेजांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक फायदा मिळत नसल्यानेच कॉलेजे उदासीन असल्याचे म्हटले जात आहे.

मूल्यांकन परिषदेने १ एप्रिल, २०१७ रोजी नवे निकष आणून नॅक मूल्यांकन अधिक कठीण केले. यातील काही निकष ग्रामीण भागातील कॉलेजांना पूर्ण करणे अवघड असल्याचे राज्य सरकारच्या बृहत आराखड्याच्या तज्ज्ञ समितीचे सदस्य अनिल राव यांनी सांगितले. यामुळेही कॉलेजे याकडे फारसे गांभीर्याने पाहताना दिसत नाहीत. मात्र आता विद्यापीठ अनुदान आयोग व राज्याच्या विद्यापीठ कायद्यातील तरतुदींमुळे कॉलेजांना आणि विद्यापीठांना येत्या काळात 'नॅक' मूल्यांकन करून घेणे अनिवार्य ठरणार असल्याचेही ते म्हणाले. याला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारही प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र दुसरीकडे अशा कॉलेजांना विशेष सोयी-सुविधा मिळत नाही. यामुळे राज्यातील बहुतांश विनाअनुदानित कॉलेजे 'नॅक'कडे फारशा उत्सुकतेने पाहात नाहीत.

मुंबई विद्यापीठ अव्वल

मुंबई विद्यापीठ सध्या 'नॅक'ची प्रक्रिया राबवत असली तरी विद्यापीठाशी संलग्न कॉलेजांपैकी २७३ कॉलेजांकडे 'नॅक' मूल्यांकन आहे. त्यापैकी ११६ कॉलेजांना 'अ' दर्जा आहे. हे प्रमाण राज्यातील इतर विद्यापीठांच्या कॉलेजांच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

विद्यापीठ संलग्न कॉलेजे नॅक दर्जा 'अ' दर्जाप्राप्त

संत गाडगेबाब अमरावती विद्यापीठ ३८२ १०२ १७

सोलापूर विद्यापीठ १०८ ४७ ८

गोंडवाना विद्यापीठ २१० ४७ २

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ २१५ ९२ १६

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ५८४ १३० २९

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ३२५ ७४ १३

मुंबई विद्यापीठ ७९१ २७३ ११६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ८८२ १९० ८५

एसएनडीटी महिला विद्यापीठ १५८ २२ ५

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २८३ १६८ ३८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ४३६ १०८ २३

एकूण ४३७४ १२५३ ३५२